**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबूराव ज्ञानेश्वर गायकवाड
मु.पो.वर्धनगड, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबूराव ज्ञानेश्वर गायकवाड
मु.पो.वर्धनगड, ता.खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा
श्री.सतीश यादवराव भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा
श्री.सूर्यकांत दामोदर देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.९.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९६३ च्या एकत्रीकरण योजनेतील आपल्या जमिनीच्या फाळणी नकाशाची मागणी आपण केली होती. परंतु सन १९३० च्या मूळ नकाशानुसार फाळणी कारणापुरती नक्कल जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सातारा यांनी आपल्याला तयार करून दिली. ती मूळ नोंदीपेक्षा असत्य आहे. म्हणून मूळ नकाशाची प्रत मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.बाबूराव ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केले.

प्रत्यक्ष जागा पाहणी करून फाळणीची नक्कल तयार करून दिली आहे. मूळ सर्वे नंबरची फाळणीनुसारच गटाची हद्द कायम समजणे हे भूमी अभिलेखानुसार वाजवी असून प्रत्यक्ष मोजमापानुसार फाळणी पुनर्गठन करून तसा नकाशा देण्यात आला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सातारा श्री.सूर्यकांत दामोदर देशमुख यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते विचारात घेता माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. गौतम यशवंत कांबळे
मु.पो. वाघवे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पन्हाळा, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री जयहिंद विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था
मर्यादित, मु. वाघवे, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. गौतम यशवंत कांबळे
मु.पो. वाघवे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पन्हाळा, जि. कोल्हापूर श्री. सुरेश देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री जयहिंद विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था
मर्यादित, मु. वाघवे, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर
श्री. बळीराम दगडू शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००८/ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती श्री जयहिंद विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्यादित, मु. वाघवे, यांच्या सचिवांनी विलंबाने, अपुरी व चुकीची दिली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा सचीव यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. गौतम यशवंत कांबळे यांनी केली.

श्री. नारायण बाबू कांबळे, श्री. गौतम यशवंत कांबळे व त्यांचे सहकारी सातत्याने गटबाजीतून माहितीची मागणी करीत असतात. वेळोवेळी त्यांना उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. त्यांनी अर्ज केला तेव्हा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला नव्हता. तो जाहीर झाल्यावर त्याबाबतची माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पन्हाळा यांच्या कार्यालयाने त्यांना दिली. कच्चा मतदार यादीवर हरकत घेऊन श्री. कांबळे यांनी न्यायाधिश, सहकार न्यायालय, कोल्हापूर यांच्याकडे दाखल केलेला दावा न्यायालयाने फेटाळला. निवडणुकीत श्री. कांबळे यांच्या पॅनेलचा पराभव झाला, त्यामुळे ते त्रास देत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री जयहिंद विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्यादित, मु. वाघवे, श्री. बळीराम दगडू शेलार यांनी केले. माहिती संस्था स्तरावरील असल्याने ती देण्याचा आदेश संस्थेला दिला व आपल्या कार्यालयाकडील उपलब्ध माहिती देऊ केली होती. वेळोवेळी श्री. कांबळे यांनी मागणी केलेली कागदपत्रे विनाविलंब त्यांना देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पन्हाळा श्री. सुरेश देशमुख यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.पी.के.देशमुख
कौस्तुभ, सैनिकी स्कूल गेटजवळ, सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.५.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.५.२००८ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९५६ ते १९५८ या काळातील सेवाखंड क्षमापित करून अगोदरची सेवा निवृत्तपात्र मानण्यासाठी आपण केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने इतर काही प्रकरणांमधील निकषाची व ते निकष आपल्याला का लावण्यात येत नाहीत, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.पी.के.देशमुख यांनी मागितली होती. विहित मुदतीत त्याबाबतचे उत्तर त्यांना पाठविण्यात आले. तसेच आपल्या कक्षेत नसलेली माहिती अन्य जन माहिती अधिकाऱ्यांकडून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाहीसाठी अर्ज शालेय शिक्षण विभागाकडे पाठविला. दोन प्रकरणातील माहिती श्री.देशमुख यांच्याकडे होतीच. तथापि त्या माहितीच्या निमित्ताने त्या निकषाप्रमाणे स्वत:बाबतही कार्यवाही व्हावी ही श्री.देशमुख यांची मुख्य मागणी आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई श्री.मा.के.केन्द्रे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीसाठी स्वतंत्रपणे सादर केले. उपलब्ध कागदपत्रे पाहता त्यांचे प्रतिपादन रास्त आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे**
**दि.२६.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. चंद्रशेखर जगदीश शाळिग्राम
११८७/१, प्लॉट नं.१८, ई-वॉर्ड,
राजारामपुरी, चौथी गल्ली, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
सातवा मजला, सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, मुंबई-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
सातवा मजला, सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, मुंबई-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०४ / कोल्हापूर |
| २ | सनावणीची तारीख | दि. ७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. चंद्रशेखर जगदीश शाळिग्राम
११८७/१, प्लॉट नं.१८, ई-वॉर्ड,
राजारामपुरी, चौथी गल्ली, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
सातवा मजला, सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, मुंबई-१
डॉ. बसंत चंपालालजी बागडी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
सातवा मजला, सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, मुंबई-१
श्री. रामेश्वर महालिंग कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.५.२००८ |
| ८. | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. ७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

खाजगी नेत्रचिकित्सा सहाय्यक व दुकानदार यांच्या अधिकाराबाबतची माहिती आपण मागितली होती. अधिकार नसताना नेत्रचिकित्सा करुन अशी मंडळी बराच गैरप्रकार करीत आहेत. हा सार्वजनिक आरोग्याशी निगडीत विषय असल्यामुळे अशा बनावट डॉक्टरांबाबत नेमकी जबाबदारी कोणाची आहे हे आरोग्य खात्याने कळविले पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. चंद्रशेखर जगदीश शाळिग्राम यांनी केले. डॉ.शाळिग्राम यांनी खाजगी दुकानांबाबत माहिती मागितली असून आरोग्य सेवा संचालनालयाच्या कक्षेतील हा विषय नाही. त्यासाठी स्वतंत्र मंचाकडे श्री. शाळिग्राम यांना दाद मागावी लागेल, असे डॉ. शाळिग्राम यांना स्पष्ट केले आहे. या स्वरुपाचे ८ अर्ज त्यांनी केले असून वेळोवेळी त्यांना उत्तर देण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई डॉ. रामेश्वर महालिंग कुंभार यांनी केले. बनावट डॉक्टरांसंबंधीचा विषय संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याशी निगडीत असल्याचे डॉ. शाळिग्राम यांना स्पष्ट करण्यात आले असून बनावट डॉक्टरांवर होणाऱ्या कारवाईबाबतच्या शासन निर्णयाची प्रत देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई डॉ. चंपालालजी बागडी यांनी नमूद केले.

बनावट डॉक्टरांविरुध्दच्या कारवाईची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अन्य माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २५.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुसूदन परशुराम लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्याशाळेसमोर, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मधुसूदन परशुराम लिमये<br>३७९, शनिवार पेठ, कन्याशाळेसमोर, पुणे-३० |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | **अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५<br>श्री. सुरेश जगताप |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | **जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५<br>श्री. एस.एस.भोसरेकर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपली मोकळी जागा समाईक ठरविली, त्याबाबतची कागदपत्रे आपल्याला दिली जात नाही. शेजारच्या मिळकतीची मूळ मापे व प्रत्यक्षात वापरलेली जागा यात तफावत असून रस्ता रूंदीसाठी दिलेली नुकसान भरपाई घेऊन त्या जागेत बांधकाम केले जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मधुसूदन परशुराम लिमये यांनी केली.

दोन मिळकत धारकांमधील वादाचा हा विषय असून माहिती विहित मुदतीत दिली आहे. क्षेत्रफळात तफावत असल्याचे श्री. लिमये यांचे म्हणणे आहे. त्याबाबतची खात्री मूळ अभिलेख खात्याकडून करून घ्यावी लागेल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. एस.एस.भोसरेकर यांनी केले. श्री. लिमये यांनी याच जागेच्या संदर्भात वेळोवेळी केलेल्या अर्जावर माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

आपल्याला दिलेली माहिती खोटी असून संबंधितांवर हेतूपुरस्सर कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच आपल्याला पाठविलेल्या उत्तराची तारीख चुकीची असल्याचे रजिस्टर्ड टपालाच्या पावतीवरून स्पष्ट होते, असे प्रतिपादन श्री. लिमये यांनी केले. त्यासोबत त्यांनी रजिस्टर्ड टपालाची पावती सादर केली. मात्र श्री. लिमये यांना दुसऱ्या विषयात पाठविलेल्या रजिस्टरची ही पावती आहे. श्री. लिमये दिशाभूल करीत आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. एस. एस. भोसरेकर यांनी कागदपत्रांसह स्पष्ट केले.

रस्ता रुंदीसाठी जागा घेतली असताना त्यावर बांधकाम केले जात आहे का, यासह श्री. लिमये यांच्या अर्जातील चार मुद्दयांबाबतच्या कार्यवाहीच्या अहवाल जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी आठ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तपशीलवार अहवाल उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सुरेश जगताप यांनी दि. २६.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. परंतु आपण मागितलेल्या प्रश्नांची माहिती त्यात दिलेली नाही, अशी तक्रार श्री. लिमये यांनी दि. १६.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र श्री. लिमये यांनी उपस्थित

केलेल्या मुद्दयांचा विचार जन माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रात आहे. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.११.२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सनातन यशवंत कांबळे
मु.पो.वसगडे, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
करवीर उपविभाग, ता.करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सनातन यशवंत कांबळे
मु.पो.वसगडे, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री.तुकाराम कासार

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
करवीर उपविभाग, ता.करवीर, जि. कोल्हापूर श्री.दिपक क्षीरसागर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००९ रोजी घेण्यात आली.

सन १९९१ मध्ये झालेल्या पोलीसपाटील भरतीतील वसगडे येथील पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होते, याची व त्यासंबंधीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सनातन यशवंत कांबळे यांनी केले.

श्री.कांबळे यानी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने चौकशी अहवाल तहसीलदारांकडून मागविला होता. परंतु अहवाल आढळ होत नसल्याचे तहसील कार्यालयाने कळविल्यामुळे माहिती देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, करवीर उपविभाग, कोल्हापूर श्री.दिपक क्षीरसागर यांनी सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या निर्णयानुसार चौकशी करून योग्य तो निर्णय घ्यावा, असे निवेदन श्री.कांबळे यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर दिले. त्यानुसार चौकशी करण्यात आली व संबंधित माहिती श्री.कांबळे यांना तपशीलवार देण्यात आली. संबंधित अभिलेख १७ वर्षांपूर्वीचे असल्यामुळे शोध घेण्यात येत आहे. तहसीलदार, करवीर यांनीही ते आढळ होत नसल्याचे दि.१२.१२.२००८ च्या पत्राने कळविले आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, करवीर उपविभाग, कोल्हापूर श्री.दिपक क्षीरसागर यांनी दिले.

श्री.कांबळे यांच्या मागणीच्या अनुषंगाने १५ दिवसात चौकशी करून कागदपत्रांची पूर्तता करावी, असे मौखिक आदेश आयोगाने दिले. त्यानुसार दि.२६.१२.२००८ रोजी श्री.संजय चवगोंडा पाटील, पोलीस पाटील, वसगडे यांच्याकडून मूळ कागदपत्रे उपलब्ध करून त्याच्या प्रती श्री.कांबळे यांना पुरविण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.दिपक खीरसागर यांनी दि.२.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२५.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रमोद प्रभाकर मलठणकर
मु.पो.इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
इंदापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.,
इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४११ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. प्रमोद प्रभाकर मलठणकर
मु.पो.इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे श्री. जी.बी.कौटे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
इंदापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.,
इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. सतीश प्रल्हाद जाधव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.८.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या पध्दतीने माहिती विहित मुदतीत मिळाली नाही, ती विलंबाने देऊनही शुल्क भरण्यास सांगितले, म्हणून माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रमोद प्रभाकर मलठणकर यांनी केली.

श्री. मलठणकर यांनी विहित मुदतीत माहिती देऊ केली होती. परंतु विशिष्ट पध्दतीतच माहिती हवी असल्याचा आग्रह त्यांनी धरला. खतावण्याच्या नकलांच्या छायांकित प्रती तयार ठेवल्या होत्या. त्यांना कळवूनही माहिती नेली नाही. आजही संपूर्ण माहिती सोबत आणली आहे. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर यांच्याकडे माहिती सादर केल्यावर त्यांनीही श्री. मलठणकर यांना कळविले होते. परंतु कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, इंदापूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी श्री. सतीश प्रल्हाद जाधव यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर श्री. जी.बी. कौटे यांनी ते रास्त असल्याचे पूरक कागदपत्रांसह सांगितले.

अपीलकर्ता श्री. मलठणकर यांनी चुकीचा तपशील देऊन दिशाभूल केल्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले, त्याच दिवशी १०४ प्रती त्यांना देण्यात आल्याचे त्यांची पोहच असल्याच्या स्वाक्षरीसह जन माहिती अधिकारी तथा सचिव, इंदापूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी श्री. सतीश प्रल्हाद जाधव यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १७.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. अविनाश विलासराव अंबपकर
घर नं.२६०९, डी वॉर्ड,
दुसरी डांगे गल्ली, जुना बुधवार, कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था,
२०४/ख/ई, शाहूपुरी,भू-विकास बँक इमारत, ३ रा मजला,
हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा अवसायक व सहाय्यक निबंधक,
दि रवि को-ऑप. बँक लि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१३ [redacted] / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०६.०१.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. अविनाश विलासराव अंबपकर<br>घर नं.२६०९, डी वॉर्ड,<br>दुसरी डांगे गल्ली, जुना बुधवार, कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था,<br>२०४/ख/ई, शाहूपुरी,भू-विकास बँक इमारत, ३ रा मजला,<br>हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०१.०८.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

नागरी सहकारी बँकाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणास्तव दि रवि को-ऑप बँकेच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती नाकारली व दिशाभूल करणारे उत्तर दिले. दि.२४.१२.२००७ पासून बँक अवसायनात निघाली असून सहकार खात्यातील सहाय्यक निबंधक श्री.एस.एस.कुंभार अवसायक म्हणून नियुक्त आहेत. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांच्याकडे झालेल्या सुनावणीला ते गैरहजर होते. बँकेवर महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याचे पूर्ण नियंत्रण असून खात्याचे प्रतिनिधीच बँकेचे कामकाज पाहत आहेत. त्यामुळे बँकेची सर्व माहिती आपल्याला मिळाली पाहिजे. परंतु श्री. कुंभार यांच्याबद्दल गैरव्यवहार प्रकरणी चौकशी चालू असून गैरव्यवहार उघड होऊ नये म्हणूनच ते आपल्याला माहिती नाकारत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अविनाश विलासराव अंबपकर यांनी केले.

श्री.अंबपकर यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अर्ज केला होता. नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो की नाही या संदर्भातील दावा न्यायालयात प्रलंबित असल्याने तूर्त कायदा लागू नसल्याची स्थिती राज्य माहिती आयोगाने मान्य केली होती त्यानुसार आपण अपील फेटाळले. मात्र प्रशासक अवसायक नेमल्यास पूर्ण कारभार सहकार खात्याच्या नियंत्रणाखाली असतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी केले.

दि रवि को-ऑप बँक ही नागरी सहकारी बँक असली तरी रिझर्व्ह बँकेने केलेल्या कार्यवाहीनुसार या बँकेचे व्यवस्थापन शासनाच्या प्राधिकाऱ्याकडून चालविले जात आहे. श्री.कुंभार अवसायक म्हणून काम पहात आहेत, हे लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी श्री. अंबपकर यांचा मूळ अर्ज दुसऱ्याच दिवशी बँकेच्या

व्यवस्थापनाकडे वर्ग केला. अवसायक नियुक्त असताना माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ सहकारी बँकांना लागू नसल्याचे प्रतिपादन पूर्ण अयोग्य आहे. अवसायकाच्या अखत्यारीतील सर्व माहिती देणे बंधनकारक आहे, म्हणून श्री.कुंभार यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी श्री.कुंभार यांना त्याच दिवशी, दि.०६.०१.२००९ रोजीच्या पत्रान्वये हा आदेश कळविला. 'माहिती देण्याबाबत हयगय झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील,' असे या पत्रात श्री.डोईफोडे यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यानंतरही श्री. कुंभार यांनी माहिती दिल्याचा अहवाल आयोगाला सादर केलेला नाही. याचा अर्थ श्री.कुंभार जाणीवपूर्वक माहिती नाकारत आहेत. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. दि रवि को-ऑप बँक, कोल्हापूर चे अवसायक व सहाय्यक निबंधक श्री.एस.एस.कुंभार यांनी अपीलकर्त्यास माहिती विहित मुदतीतच नव्हे, तर आयोगाच्या आदेशानंतरही माहिती न पुरविणे ही गंभीर बाब असून त्याबद्दल त्यांना रुपये २५,०००/- शास्ती करण्यात येत आहे. नोव्हेंबर २००९ च्या वेतनापासून दि.१०.०२.२०१० पर्यंत सलग तीन हप्त्यात ही शास्ती वसूल करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी करुन, तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंदी घेऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. : १२-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. दत्तात्रय रामचंद्र हत्तरगे
वॉर्ड नं.७,घर नं.९१, लक्ष्मी मार्केट,
मु.पो.इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, ग्रॅंट मेडिकल फाऊंडेशन,
रुबी हॉल क्लिनिक, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, ग्रॅंट मेडिकल फाऊंडेशन,
रुबी हॉल क्लिनिक, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०७.०१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दत्तात्रय रामचंद्र हत्तरगे
वॉर्ड नं.७,घर नं.९१, लक्ष्मी मार्केट,
मु.पो.इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, ग्रॅंट मेडिकल फाऊंडेशन,
रुबी हॉल क्लिनिक, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, ग्रॅंट-मेडिकल फाऊंडेशन,
रुबी हॉल क्लिनिक, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- — |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- — |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- — |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

ग्रँट मेडिकल फाऊंडेशन, रुबी हॉल, पुणे यांच्याकडून आपल्यावरील शस्त्रक्रियेबाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु ती मिळाली नाही, अशा कारणांवरुन अपीलकर्ता श्री. दत्तात्रय रामचंद्र हत्तरगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. हत्तरगे यांनी माहिती मागणीच्या अर्जात शस्त्रक्रियेचे संदर्भात तक्रारीच्या अनुषंगाने खुलासे मागणारे अनेक प्रश्न विचारले आहेत. बिलाबाबत त्यांची तक्रार असून माहितीच्या अधिकारात त्याचा समावेश होत नाही, याबाबत असे आयोगाने निर्देशित केले, हे लक्षात घेऊन आपण ग्राहक मंचाकडे दाद मागणार असल्याचे श्री. हत्तरगे यांनी सांगितले.

श्री. हत्तरगे यांनी पाठविलेले पत्र व स्मरणपत्र प्राप्त होऊनही ग्रँट मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल,पुणे यांनी कोणतेही उत्तर न पाठविणे योग्य नाही. याची समज अध्यक्ष, ग्रँट मेडिकल फाऊंडेशन, रुबी हॉल, पुणे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. : २५ -११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. सिताराम दत्तात्रय पाटील
रा. कपिलेश्वर , पो. तुरंबे, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
१. गजानन पाणी पुरवठा संस्था
२. वेणूताई चव्हाण सेवा सोसायटी,
कपिलेश्वर, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सिताराम दत्तात्रय पाटील
रा. कपिलेश्वर , पो. तुरंबे, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
१. गजानन पाणी पुरवठा संस्था
२. वेणूताई चव्हाण सेवा सोसायटी,
कपिलेश्वर, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर
श्री. तुकाराम माणकू भारमळ
श्री. रघुनाथ बळवंत पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.६.२००८ |
| ८. | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण सचिव, गजानन पाणी पुरवठा संस्था व वेणूताई चव्हाण सेवा सोसायटी या दोन संस्थांकडे ठेव व भाग भांडवलाची रक्कम परत न केल्याबाबतची माहिती मागितली होती. परंतु वेणुताई चव्हाण सेवा सोसायटीने एक वर्षाने व गजानन पाणी पुरवठा संस्थेने सुमारे दोन वर्षांनी माहिती दिली. विहिरीवरील पाझरपट्टी, भागभांडवलाची रक्कम परत देणे, कर्जवसुली, मुलांनी शेतात खणलेली विहिर आदी सर्व बाबतीत या दोन्ही संस्था आपल्याला त्रास देत आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सिताराम दत्तात्रय पाटील यांनी केले.

श्री. पाटील मुळात या दोन्ही संस्थाचे सभासद होते. त्यानंतर त्यांनी तिसरी सोसायटी काढली आहे. पाझरपटटीच्या संदर्भात सहकार न्यायालयात दावा दाखल आहे. दोन्ही संस्थामध्ये त्यांच्या नावे कर्जाची थकबाकी आहे. या संस्थांना त्रास देण्यासाठी ते सातत्याने वेगवेगळया अधिकाऱ्यांकडे तक्रारी अर्ज देत असतात. माहिती मागणारे पाच अर्ज त्यांनी केले असून माहितीच्या अधिकाराचा गैरवापर ते करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन गजानन पाणी पुरवठा संस्था व वेणूताई चव्हाण सेवा सोसायटी, या संस्थाचे जन माहीती अधिकारी तथा सचिव श्री. तुकाराम मानकू भारमळ व श्री. रघुनाथ बळवंत पाटील यांनी केले.

श्री. पाटील यांना माहिती देण्यात आली आहे व ते त्यांनी मान्य केल्याचे प्रथम अपिलाच्या निकालपत्रात आपण नमूद केले आहे. त्यांच्या ठेवीची रक्कम परत करणे आदीबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राधानगरी यांनी श्री. पाटील यांना स्वतंत्ररीत्या कळविले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आली असून त्यांनी उपस्थित केलेले अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. आपपसातील वादांसाठी सर्व यत्रंणाचा वेळ व परिश्रम उभय बाजूंनी वाया घालवू नये, अशी समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५.११.२००९**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक बाजीराव पाटील
ए/३, चौरंगी कॉम्प्लेक्स, नागाळा पार्क, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शाहूवाडी,
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शाहूवाडी,
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक बाजीराव पाटील
ए/३, चौरंगी कॉम्प्लेक्स, नागाळा पार्क, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शाहूवाडी,
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोतोळीकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शाहूवाडी,
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.बी.एस.सुतार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.८.२००७ व १९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००७ व १७.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याविरूध्द सन २००३ मध्ये तहसीलदारांकडे केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षकांनी दिलेली नोटिस, जाबजबाब, तपास इ.ची माहिती अभिलेख कक्षामध्ये कागदपत्रे आढळ होत नाही या कारणावरून नाकारण्यात आली. जाणीवपूर्वक ही माहिती नाकारली जाते, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक बाजीराव पाटील यांनी केली. संबंधित कागदपत्रे अभिलेख कक्षात आढळ होत नसून शोध घेण्यात येत आहे. २००३ सालचे पत्र असून माहिती नाकारण्याचा उद्देश नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शाहूवाडी तहसील कार्यालय, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.बी.एस.सुतार व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शाहूवाडी तहसील कार्यालय, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोतोळीकर यांनी केले. संबंधितांकडून अभिलेख उपलब्ध करून माहिती अपीलकर्त्यास द्यावी, जतनाच्या कालावधीनुसार संबंधित कागदपत्रे जतन केली गेली नसल्यास त्याबाबतची जबाबदारी असणाऱ्या कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

शोध घेऊन उपलब्ध झालेली कागदपत्रे श्री.पाटील यांना देण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.बी.एस.सुतार व अपिलीय प्राधिकारी श्री.पी.एस.कोतोळीकर यांनी दि.१७.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. परंतु आपण मागितलेली कागदपत्रे व देण्यात आलेली कागदपत्रे वेगवेगळी असून संबंधितांवर शास्तीसह कार्यवाही करावी, अशी मागणी

श्री.पाटील यांनी दि.५.२.२००९ च्या पत्रान्वये केली. संबंधित कागदपत्रांच्या प्रती श्री.पाटील यांच्या मूळ अर्जातील मागणीनुसार आहेत. मात्र पोलीस निरीक्षकांनी चौकशी करून कार्यकारी दंडाधिकारी, शाहूवाडी यांच्याकडे पाठविलेल्या अहवालाची व सोबतच्या जाबजबाबाची प्रत दिलेली नाही, असे त्यांनी म्हटले आहे. त्याबाबत विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शाहूवाडी तहसील कार्यालय, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांनी शहानिशा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पोलीस स्टेशन यांनी कार्यकारी दंडाधिकारी, शाहूवाडी यांच्याकडे पाठविलेला अहवाल व त्यासोबतचे जाबजबाब यांच्या प्रतीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांनी शहानिशा करून दि.२०.१२.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजय यशवंत घाटगे
७१८/क/ख, ए वॉर्ड, संभाजीनगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. विजय यशवंत घाटगे
७१८/क/ख, ए वॉर्ड, संभाजीनगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
श्री. गणेश एन. देशमुख, उप आयुक्त

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.५.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.६.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मेडीकल हेल्थ सिटी प्रकल्पाच्या निविदेची अंतिम कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ऊवरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी मान्य केले असल्यामुळे तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. विजय यशवंत घाटगे यांनी सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजय यशवंत घाटगे
७१८/क/ख, ए वॉर्ड, संभाजीनगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बिजय यशवंत घाटगे
७१८/क/ख, ए वॉर्ड, संभाजीनगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
श्री. गणेश एन. देशमुख, उप आयुक्त

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.५.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.६.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मेडीकल हेल्थ सिटी प्रकल्पाच्या निविदेची अंतिम कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ऊवरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी मान्य केले असल्यामुळे तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. विजय यशवंत घाटगे यांनी सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दिलीप आप्पासो बुरूटे
मु. पो. शेगाव, ता. जत, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
शाखा जत, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
शाखा जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
शाखा जत, जि. सांगली श्री. बी. बी. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
शाखा जत, जि. सांगली श्री. जी. बी. उत्पात

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ४.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. दिलीप आप्पासो बरूटे यांनी मागितलेली माहिती संकलित करुन शुल्काबाबत त्यांना कळविले. त्यांनी शुल्क भरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. श्री. बुरुटे यांनी त्यांच्या शेताजवळील जिल्हा परिषद शाळेसाठी वीज कनेक्शनकरिता वाहिनीचे काम चालू केल्यानंतर तक्रार अर्ज केला व त्यानंतर त्याबद्दल माहिती मागणारा अर्ज केला. त्यामुळे काम बंद ठेवण्यात आले. या कामातील खांबावरुन आपल्याला वीज मिळाल्यास जास्त पैसे भरावे लागतील हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जत यांनी त्याबाबत चर्चा करुन मार्ग काढला. परंतु श्री. बुरूटे यांनी वीज कनेक्शनसाठी मागणी अर्ज केलेला नसल्यामुळे त्यांना कनेक्शन दिलेले नाही. त्यांच्यामुळे शाळेच्या वीज पुरवठ्याचे काम मात्र दोन वर्षे रखडले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जत श्री. जी. बी. उत्पात यांनी केले. आयोगाच्या आदेशानुसार तसे लेखी निवेदन सहाय्यक अभियंता (सं.व.सु), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि., उपविभाग, जत यांनी दि. ६.४.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**पुणे**
**दि. १९ .११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.पुंडलिक तायाप्पा ठोमके
उदगाव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत उदगाव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पुंडलिक तायाप्पा ठोमके
उदगाव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एम.जे.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत उदगाव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.ए.एन.गोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मिळकतधारकांनी आपआपल्या क्षेत्राप्रमाणे बांधकाम केले की नाही व बोळ रस्त्यावर अतिक्रमण केले की नाही, याबाबतची माहिती खोटी दिली. सरकारी मालकीच्या बोळ रस्त्यावर अतिक्रमण झाले असून ते काढून टाकावे अशी आपली मागणी आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.पुंडलिक तायाप्पा ठोमके यांनी केले. श्री.ठोमके यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. याच संदर्भात त्यांनी लोकआयुक्तांकडे तक्रार केली होती. बोळ रस्त्यातील अडथळा काढला असे त्यांनी लिहून दिले व त्यानंतर आमच्याविरूध्द दावा दाखल केला, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत उदगाव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.ए.एन.गोरे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.जे.पवार यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.११.२००९